# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

### श्री. जयेश प्रतापराव पाटील

कृषि उद्योजक/पशु उद्योजक, बी. एस्सी. (कृषि), कृषि महाविद्यालय, धुळे, एम.बी.ए. (डेअरी)

मु. पो. पिंप्री, ता. जि. धुळे



संपर्क क्रं. : ८५३०६४१४०८

**उद्योगाचे नांव**

- माऊली दुग्ध व्यवसाय

**कृषि उद्योगाची माहिती**

- सन २००३ पासून सुरुवात
- ३० एकर जमीन भाडेकरार तत्वाने, ५ एकर स्वत:ची
- ३० एकर चारा पिके (सेंद्रिय पध्दतीने), १० एकर ऊस, ५ एकर मका (ऑफ्रिकन टॉल)
- दुग्ध उत्पादन - ७०० लिटर प्रति दिन
- शेणखत उत्पादन - ४०० टन प्रति वर्ष
- पशुधन - म्हशी (जाफराबादी) -१००
  गीरगाय - १०

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**

- शास्त्रोक्त पध्दतीने पशुसंगोपन (म्हैस व देशी गोपालन)
- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी शिफारशीत चारा पिके उत्पादन तंत्र
- शिफारशीत तंत्रज्ञानानुसार पशुखाद्य व्यवस्थापन
- पुरक आहारामध्ये नियमितपणे खनिज मिश्रणाचा समावेश, नियमीत लसीकरण, रोगनिदान यांच्याव्दारे योग्य गोठा व्यवस्थापन करुन स्वच्छ दुधाचे उत्पादन
- मागणीनुसार गुणवत्तापुर्ण दुग्धजन्य पदार्थ उत्पादन
- सेंद्रिय उत्पादनासाठी शेणखताचा वापर व विक्री
- पशुपैदाशीसाठी उच्च वंशावळीचा जातीवंत रेडा (जाफराबादी) उत्पादन व विक्री
- गोठ्यातील पशुधन व्यवस्थापनाच्या नियमित नोंदी

**वार्षिक उलाढाल :** रु. २ कोटी १० लाख

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाव्दारे शेतकऱ्यांना पशुसंवर्धनाचे प्रशिक्षण
- पशुसंगोपनातून ग्रामिण भागात शाश्वत रोजगार निर्मिती
- देशी गोवंश प्रचार प्रसिध्दी, मार्गदर्शन, प्रशिक्षण
- महाराष्ट्रामध्ये गीर गायींचा पुरवठा करण्यामागे मोठे योगदान

**विविध समित्यांवर तज्ञ सल्लागार**

- कृषि विभाग, आत्मा, कृषि विज्ञान केंद्र, महिला आर्थिक विकास महामंडळ, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग व कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे मास्टर ट्रेनर म्हणून सहभाग

**रोजगार निर्मिती**

- १५ व्यक्तींना नियमीत रोजगार

**पुरस्कार**

- ॲग्रोवर्ल्ड - सर्वोत्कृष्ट पशुउद्योजक (२०१६)
- ॲग्रोवन - सर्वोत्कृष्ट पशुउद्योजक (२०१७)
- सिंचन परिषद - सर्वोत्कृष्ट पशुउद्योजक (२०१९)
- कृषिथॉन - युवा पशुपालक पुरस्कार (२०२२)








## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

### श्री. राजेंद्र प्रतापराव देशमुख
### सौ. सुवर्णा राजेंद्र देशमुख

मु.पो. ता. बार्शी, जि. सोलापूर



संपर्क क्रं.: ९८२२२४८४७८ / ७०२०२०५०२८

**शिक्षण** : नॉन मॅट्रीक

**जमीनधारणा क्षेत्र** : १२.५७ हे.

**पीक विविधता** : ड्रॅगन फ्रुट, सिताफळ, द्राक्षे, गोडचिंच, खजुर, शेवगा

**शेती निगडीत व्यवसाय** : गोडचिंच-ड्रॅगन फ्रुट नर्सरी

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

- गुजरात राज्यातील खजुर पिकाविषयी माहिती घेऊन महाराष्ट्रात प्रथमच बियांपासून खजुर पिकाची लागवड करुन यशस्वी उत्पादन घेतले आहे
- फळांना सुरक्षिततेसाठी म्हणून प्लॅस्टिक कव्हरचा वापर
- सिंचनासाठी ठिबक/तुषार पध्दतीचा वापर केल्यामुळे पाण्यामध्ये बचत
- फळबागेस जैविक आच्छादन
- अत्याधुनिक पॅकिंगशेड - फळांची प्रतवारी, आकर्षक पॅकिंग करुन फळांची मार्केटींग
- छाटणीनंतर झाडांच्या फांद्यांची कुट्टी करुन त्याचा मल्चींगसाठी वापर
- दुष्काळावर मात करुन सिताफळ, गोडचिंच, शेवगा, जांभूळ, आवळा, ड्रॅगन फ्रुट, खजुर व द्राक्षे या पिकांतून आर्थिक संपन्नता मिळवली
- महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिफारशीत केल्याप्रमाणे खत व्यवस्थापनामध्ये जिवाणु खते, शेणखत, गांडुळखताचा वापराबरोबरच कीड व्यवस्थापनामध्ये जैविक किटकनाशकांचा वापर तसेच निंबोळी अर्कचा वापर

**तंत्रज्ञानाचा प्रसार**

- वृत्तपत्र, आकाशवाणी, दुरदर्शन बरोबरच इतर चॅनलवरुन सिताफळ व शेवगा पिकांविषयीचे मार्गदर्शन व माहिती देतात
- शेतकऱ्यांना मिश्रपीक शेतीबद्दल मार्गदर्शन करतात
- गुजरात, तेलंगना, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यातील शेतकरी (१० ते १५ हजार), व्यापारी व कृषि विभागातील अधिकाऱ्यांनी फळबागेला भेट देऊन माहिती घेतली

**अभ्यास दौरे**

- इस्त्राईल, ऑस्ट्रेलिया व व्हिएतनाम या देशांना भेटी
- गुजरात, पंजाब या राज्यांबरोबरच महाराष्ट्रातील सर्व कृषि विद्यापीठांना भेटी देऊन माहिती घेतली

**पुरस्कार**

- कृषिनिष्ठ पुरस्कार - जिल्हा परिषद, सोलापूर (२००१-०२)
- इतर सामाजिक संस्थांचे विविध पुरस्कार

**वार्षिक उत्पन्न :** रु. ५० ते ५५ लाख









**विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

जुलै, २०२३